पालघर आवृत्ती

संपादक : संदीप ज्ञानोबा बोडके

साप्ताहिक RNI NO. MHMAR/26/A1491 www.samajsatta.com

७

www.samajsatta.com

Mo. : 9049940157

# समाज सत्ता

■ वर्षे १ ले ■ अंक ७ ■ पालघर, सोमवार, दि. ११ मे ते १७ मे २०२६ ■ मुल्य : २ रु ■ पान ४

# अर्नाळा येथील कारवाईबाबत पालघर जिल्हा प्रशासनाचे स्पष्टीकरण; पारंपरिक मच्छीमारांच्या संरक्षणाचा पुनरुच्चार

**पालघर :** अर्नाळा येथे नुकत्याच करण्यात आलेल्या अतिक्रमण निष्कासन कारवाईबाबत काही सोशल मीडिया पेजेस व माध्यम संस्थांकडून प्रसारित करण्यात येणारी दिशाभूल करणारी व चुकीची माहिती लक्षात घेऊन पालघर जिल्हा प्रशासनाकडून हे स्पष्टीकरण देण्यात येत आहे. प्रशासनाने पुनरुच्चार केला आहे की, सर्व कारवाई पूर्णपणे कायदेशीर चौकटीत राहून करण्यात आली असून पारंपरिक मच्छीमार समाजाच्या हक्कांचे संरक्षण करणे हेच प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.



अधिकृत अभिलेखांनुसार, सर्वे क्रमांक ४४ आणि ४५ ही जमीन 'शासकीय गुरचरण' म्हणून वर्गीकृत आहे. या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कांमध्ये ही जमीन पारंपरिक मच्छीमार समाजासाठी मासळी सुकविणे, बोटींची दुरुस्ती आणि बोट बांधणी यांसारख्या कामांसाठी आरक्षित असल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. अतिक्रमणांबाबतच्या असंख्य तक्रारींनंतर मत्स्य विभाग, महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभाग यांच्या वतीने संयुक्त पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान असे दिसून आले की, काही मच्छीमारांनी मासळी सुकवण्यासाठी ओटे, शेड्स आणि तात्पुरती बांधकामे उभारली होती. मात्र, काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये काही व्यक्ती आणि गटांकडून निवासी बांधकामे आणि अनधिकृतरीत्या भाजीपाला लागवड केली जात होती.

ही संयुक्त निष्कासन मोहीम १३ मे, २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता मत्स्य विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत सुरू झाली. या कारवाईदरम्यान, सर्वे क्रमांक ४५ मधील ३२ अनधिकृत बांधकामे हटवण्यात आली आणि सर्वे क्रमांक ४४ मधील १२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. याशिवाय, १८ अतिक्रमणधारकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून टाकली. पालघर जिल्हा प्रशासन पारंपरिक मच्छीमार आणि पात्र रहिवाशांच्या उपजीविकेचे आणि हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. बेकायदेशीर व्यावसायिक अतिक्रमणे आणि जमीन बळकावणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध कारवाई करण्याच्या निर्णयावर प्रशासन ठाम असले तरी, कोणत्याही पात्र रहिवाशाला किंवा पारंपरिक मच्छीमाराला अन्यायकारकपणे हटवले जाणार नाही. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या व्हिडिओंबाबत जिल्हा प्रशासनाचे असे म्हणणे आहे की, हे व्हिडिओ केवळ दिशाभूल करणारे तुकडे आहेत आणि ते मच्छीमार समाजाच्या उपजीविकेसाठी आरक्षित असलेल्या जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमणांचे संपूर्ण वास्तव दर्शवत नाहीत. प्रत्येक बांधकामाची पारदर्शकता, संवेदनशीलता आणि महाराष्ट्र शासनाच्या नियमितीकरण धोरणानुसार सखोल पडताळणी केली जात आहे. प्रशासनाने पुढे स्पष्ट केले आहे की, भविष्यातील कोणतीही कारवाई ही सविस्तर पडताळणी आणि योग्य वर्गीकरणानंतरच केली जाईल, ज्यामध्ये पारंपरिक मच्छीमार समाजाच्या उपजीविकेचे रक्षण करण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. महसूल अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना शासकीय जमिनीवर कोणतेही नवीन अनधिकृत बांधकाम न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवण्याच्या प्रकारांची प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून, अशी माहिती पसरवणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# जव्हार येथे १९ मे रोजी रोजगार मेळावा

■ **दहावीपासून पदवीधरांपर्यंतच्या उमेदवारांना सुवर्णसंधी**

**पालघर :** राज्यातील युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत २०२६-२७ या आर्थिक वर्षात तब्बल १००० रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत पालघर जिल्ह्यात २२ रोजगार मेळावे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे .

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर, मॉडेल करिअर सेंटर तसेच भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आदिवासी), जव्हार यांच्या संयुक्त विद्यमाने हा रोजगार मेळावा मंगळवार, दि. १९ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आदिवासी), जव्हार येथे हा उपक्रम पार पडणार आहे.

या मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, बीई तसेच पदवीधर शिक्षण पूर्ण केलेल्या नोकरी इच्छुक युवक-युवतींना विविध नामांकित उद्योग व कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या महा-स्वयं पोर्टलवर नोंदणी करून संबंधित प्लेसमेंट ड्राइव्हसाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी https://www.mahaswayam.gov.in/ या संकेतस्थळाला भेट देऊन प्रथम नोंदणी करावी. त्यानंतर जॉब फेअर विभागातून प्लेसमेंट ड्राईव्ह (२०२६-२७) पालघर निवडून उपलब्ध रिक्त पदांसाठी पसंती नोंदवावी. संबंधित पदासाठी आवश्यक पात्रता पूर्ण होत असल्याची खात्री करून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहताना उमेदवारांनी किमान ५ प्रतींमध्ये बायोडाटा, फोटो, आधारकार्ड, सेवायोजना नोंदणी कार्ड, बँक खात्याची माहिती तसेच शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेची कागदपत्रे सोबत आणावीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या नव्या दिशा उपलब्ध होणार असून, ग्रामीण व आदिवासी भागातील तरुणांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या ०२५२५-२९९८१२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त रेणुका तम्मलवार यांनी केले आहे.

# उष्णतेच्या लाटेपासून बचावाकरीता कामगारांसाठी विशेष सुरक्षा सूचना जारी

**पालघर :** महाराष्ट्रात सध्या 'अल निनो'च्या प्रभावामुळे उष्णतेची तीव्र लाट निर्माण झाली असून राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानाचा पारा झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर खुल्या जागेत तसेच अंगमेहनतीची कामे करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी दुपारी १२ ते ४ या वेळेत कामातून विश्रांती देण्याचे आवाहन कामगार उप आयुक्त, पालघर यांनी केले आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण, थकवा आणि इतर उष्णताजन्य आजारांचा धोका वाढला असून कामगारांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कामगारांना कामाच्या ठिकाणी थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, दर २० मिनिटांनी पाणी पिण्याची आठवण करून देणे, सावलीयुक्त कार्यक्षेत्र तयार करणे तसेच थेट सूर्यप्रकाश टाळण्याबाबत विशेष सूचना करण्यात आल्या आहेत. दिवसाच्या तुलनेने थंड असलेल्या सकाळ व संध्याकाळच्या वेळेत बाह्य कामांचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे.

तसेच सलग श्रम टाळण्यासाठी प्रत्येक तासानंतर किमान पाच मिनिटांची विश्रांती देणे, अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करणे किंवा कामाचा वेग कमी करणे यासारख्या उपाययोजना करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. नव्याने कामावर रुजू होणाऱ्या कामगारांना उष्ण हवामानाशी जुळवून घेण्यासाठी पहिल्या पाच दिवसांत मर्यादित वेळ काम देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

कामगारांना उष्णतेशी संबंधित आजारांची लक्षणे ओळखता यावीत यासाठी विशेष प्रशिक्षण देणे, 'मित्र प्रणाली' राबविणे आणि प्रशिक्षित प्रथमोपचार कर्मचारी उपलब्ध ठेवणे आवश्यक असल्याचे कामगार विभागाने स्पष्ट केले आहे. गर्भवती महिला कामगार तसेच वैद्यकीय उपचार घेत असलेल्या कामगारांनी उन्हात काम करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, हवामानातील बदलांची अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे आणि भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या संकेतस्थळाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कामगार, मालक आणि देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उष्णतेच्या आरोग्यावरील परिणामांबाबत जनजागृती मोहीम, प्रशिक्षण व माहितीपत्रकांचे वितरण करण्यावरही भर देण्यात यावा.

# तलासरीत २१ मे रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**पालघर :** राज्यातील युवकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यभरात १००० रोजगार मेळावे आणि प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्याअंतर्गत पालघर जिल्ह्यात २२ रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार असून, त्याच मालिकेतील आणखी एक महत्त्वाचा रोजगार मेळावा तलासरी येथे पार पडणार आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर, मॉडेल करिअर सेंटर आणि कॉम्रेड गोदावरी शामराव र्रीश्रशज्ञरी कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायन्स, तलासरी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. २१ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत भव्य पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

तलासरी येथील कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर कॉलेज परिसरात होणाऱ्या या मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, बीई तसेच पदवीधर उमेदवारांना विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. नामांकित कंपन्या आणि उद्योजक थेट मुलाखती घेणार असल्याने युवकांसाठी ही मोठी पर्वणी ठरणार आहे.


नोकरी इच्छुक उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या महा-स्वयं पोर्टलवर नोंदणी करून रोजगार मेळाव्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. यासाठी https://www.mahaswayam.gov.in/ या संकेतस्थळावर प्रथम नोंदणी करून लॉगिन करावे. त्यानंतर पंडित दीनदयाल उपाध्याय जॉब फेअर विभागातून रोजगार मेळावा (२०२६-२७) पालघर निवडून उपलब्ध रिक्त पदांची माहिती घेऊन पसंती क्रमांक नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहताना उमेदवारांनी किमान ५ प्रतींमध्ये बायोडाटा, पासपोर्ट फोटो, आधारकार्ड, सेवायोजना नोंदणी कार्ड, बँक खात्याची माहिती तसेच शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रतेची कागदपत्रे सोबत आणावीत, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या ०२५२५-२९९८१२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती रेणुका तम्मलवार यांनी केले आहे.

## संपादकीय

# सूर्यनारायण कोपला नागरिकांनो काळजी घ्या!




राज्यात सूर्य नारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. सध्या राज्यात प्रचंड उकाडा जाणवत असुन जवळपास सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या पुढे गेले आहे. मागील आठवड्यापासून तर राज्यात प्रचंड उकाडा जाणवत आहे. विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्य उकाड्याने हैराण झाले आहे. या महिन्याअखेर राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल असा अंदाज आहे. यावर्षी उन्हाळा कडक असेल असा इशारा हवामान तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. मागील महिन्यात म्हणजे एप्रिल महिन्यातच याची चाहूल लागली होती गेल्या महिन्यातही सर्वच शहरांचे तापमान वाढले होते. मे महिन्यात तर तापमान उच्चांक गाठत आहे म्हणूनच मे महिना जनतेसाठी जिकारीचा ठरत आहे. या महिन्यात कमाल तापमानाने उच्चांक गाठला आहे. विदर्भात तर उष्णतेची लाट आली आहे. विदर्भातील काही शहरांचे तापमान ४५ अंशाच्या पुढे गेले आहे. पारा ४५ अंशाच्या घरात गेल्याने नागरिकांची अक्षरशः होरपळ होत आहे. विदर्भासह राज्यातील काही भागात उष्णतेच्या प्रचंड लाटा वाहत आहेत. कोरडे व उष्ण वारे आणि वातावरणातील आर्द्रतेचे घटलेले प्रमाण यामुळे या उष्णतेच्या लाटा आल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. तापमानाचा पारा वाढत असल्याने उन्हाचा त्रास होऊन उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यात उष्माघाताने काहींचा बळीही गेला आहे. सध्या राज्यात उष्माघाताचे १६४ रुग्णांची नोंद झाली आहे. अर्थात ही संख्या फक्त सरकारी दप्तरी नोंद झालेल्या रुग्णांची आहे. नोंद न झालेले शेकडो उष्माघाताचे रुग्ण राज्यात आहेत. राज्यातील वाढते तापमान आणि वाढते उष्माघाताचे रुग्ण पाहता सरकारने नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे तो योग्यही आहे असे असले तरी आवश्यक कामासाठी, लग्न, देवधर्म कार्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. ग्रामीण भागात कुलदैवतांच्या यात्रा सुरू झाल्यात. कंदरीचे कार्यक्रम ठिकठिकाणी सुरू आहेत. सण समारंभ साजरे करण्यासाठी, ग्राम दैवतांचे दर्शन घेण्यासाठी, नातेवाईकांच्या भेटीगाठी घेण्यासाठी लोकांची धावपळ सुरू आहे. त्यामुळे उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागत आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिमाण माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. उन्हाळ्यात मधुमेहासारख्या व्याधी असणाऱ्या व्यक्तींनी विशेष खबरदारी घ्यायला हवी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळेत उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता देखील असते. उष्माघातापासून वाचण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावेच. दुपारी बारा ते चार यावेळेत घराबाहेर पडूच नये. काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना, टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कापडे परिधान करावेत. उन्हात काम करत असलेल्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे डिहायड्रेशन होते. डिहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते त्यामुळे चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये म्हणून सतत पाणी पित रहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराच्या बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत घ्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्या व फळांचे रस दररोज प्याले तरी हरकत नाही. उन्हाळ्यात आरोग्य बिघडतेच म्हणून प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करू शकतो.

# पिंपरी चिंचवड क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर ठरतेय - महापौर रवि लांडगे

- **किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या खेळाडूंचा महापौर कार्यालयात गौरव; आंतरराष्ट्रीय स्तरावर पिंपरी-चिंचवडचा झेंडा उंचावल्याबद्दल कौतुक**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड हे केवळ औद्योगिक शहर नसून क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर बनत आहे. आपल्या शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत आहेत, ही प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी बाब आहे. जयदेव म्हमाणे यांच्यासारख्या खेळाडूंमुळे शहरातील युवा पिढीला नवी ऊर्जा मिळत आहे. अशा खेळाडूंच्या पाठीशी महापालिका कायम ठामपणे उभी राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या विद्यार्थ्यांचा महापौर कार्यालयात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव उपस्थित होते. खेळाडूंना भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासनदेखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी दिले.

उत्तर प्रदेशमधील सहारनपूर येथे नुकत्याच भारत-नेपाळ यांच्यात पार पडलेल्या इंडियन इंटरग्रील चॅम्पियन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून खेळताना थेरगाव येथील चार खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराचा गौरव वाढविला. यामध्ये जयदेव म्हमाणे यांनी सुवर्णपदक पटकावत विशेष यश संपादन केले. यापूर्वीही त्यांनी तब्बल ११ सुवर्णपदके जिंकून आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप उमटवली आहे. त्यांच्या उल्लेखनीय यशाची दखल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील घेतली असून, हे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाचे क्षण असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, 'खेळाडूंचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शहराचा सन्मान असतो. कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर पिंपरी चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. भविष्यात अशा खेळाडूंना अधिक प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,' असे देखील त्यांनी सांगितले.

# ऊर्जा बचत धोरणाबाबत महापालिकेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

- **ऊर्जा बचतीच्या प्रकल्पांसाठी निधी संरचना आणि अंमलबजावणीवर झाली चर्चा**

**पिंपरी :** महापालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा बचतीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम हे केवळ अभ्यास, अहवाल आणि सादरीकरणांपुरते मर्यादित राहता कामा नयेत. प्रत्यक्ष अंमलबजावणीतून वीज वापरात लक्षणीय बचत आणि कार्यक्षम ऊर्जा व्यवस्थापनाचे ठोस परिणाम दिसून येणे गरजेचे आहे. त्यासाठी वेळबद्ध कृती आराखडा तयार करून ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धन, आर्थिक बचत आणि शाश्वत विकास या तिन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणारी कार्यपद्धती महापालिकेने स्वीकारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा अवलंब करून वीज बचत, खर्च नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धन साध्य करण्याच्या उद्देशाने ऊर्जा बचत धोरणांतर्गत विविध उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण बैठक पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात संपन्न झाली. या बैठकीत महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतींमधील एसी यंत्रणा, वॉटर पंप तसेच अन्य विद्युत उपकरणांच्या ऊर्जा वापराचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता संतोष दुर्गे तसेच एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी), अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) या संस्थांचे प्रतिनिधी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) सोबत यापूर्वीच सामंजस्य करार केला असून त्या अंतर्गत अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ), एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) यांच्या संयुक्त विद्यमाने ऊर्जा कार्यक्षमतेसंदर्भातील अभ्यास आणि नियोजन प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या ऊर्जा वापराचे विश्लेषण, ऊर्जा बचतीच्या संधींचा शोध, आर्थिक व्यवहार्यता तसेच आवश्यक निधी संरचना याबाबत विविध टप्प्यांमध्ये काम करण्यात येत आहे. बैठकीमध्ये इन्सेप्शन रिपोर्ट, महापालिकेच्या वित्तीय स्थिती व ऊर्जा खर्च विश्लेषण अहवाल, प्राथमिक आर्थिक मॉडेल व व्यवसाय आराखडा, निधी संरचना अहवाल, प्री-फिजिबिलिटी स्टडी तसेच अंतिम आर्थिक मॉडेल आणि अंतिम प्री-फिजिबिलिटी स्टडी अहवाल या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर संगणकीय सादरीकरण करण्यात आले आणि त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत ऊर्जा बचत उपाययोजनांसाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीचे विविध पर्याय, निधी उभारणीची संरचना तसेच अंमलबजावणीची कार्यपद्धती याबाबत चर्चा करण्यात आली. ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांची अंमलबजावणी करताना दीर्घकालीन शाश्वतता, आर्थिक व्यवहार्यता आणि प्रत्यक्ष ऊर्जा बचतीचे मोजमाप यावर विशेष भर देण्याच्या सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. तसेच केवळ अहवाल आणि अभ्यासापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देऊन ऊर्जा बचतीची ठोस परिणामकारकता दिसून यावी, यासाठी वेळबद्ध नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण नियामक मंडळ व वार्षिक सर्वसाधारण बैठक पुणे येथे संपन्न

- **प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करा-मंत्री अतुल सावे**

**पुणे :** राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सौर सयंत्र प्राधान्याने पूर्ण करावे तसेच प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करावेत. याशिवाय सामाजिक उत्तर दायित्व निधीद्वारे सौर प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश अपारंपरिक ऊर्जा मंत्री तथा महाऊर्जाचे अध्यक्ष अतुल सावे यांनी दिले.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) नियामक मंडळाची १०८ वी तसेच ३१ वी वार्षिक सर्वसाधारण बैठक आज पुणे येथील महाऊर्जा भवन येते पार पडली. यावेळी राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महाऊर्जा महासंचालक ओमप्रकाश बकोरिया, अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर व सर्व विभागांचे महाव्यवस्थापक , उपसंचालक लेखा व इतर अधिकारी उपस्थित होते.

## 'महाज्योती'च्या गुणवंतांचे यूपीएससी निकालात 'शतक'

**नागपूर :** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) ने राष्ट्रीय स्तरावरील प्रशासकीय सेवांच्या क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करत एक इतिहास रचला आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) वतीने जाहीर झालेल्या भारतीय वन सेवा परीक्षा २०२५ च्या अंतिम निकालात 'महाज्योती'कडून प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतलेल्या ८ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

"printed by Weekly SAMAJ SATTA and published by RAJESH SUKALAL DHIVAR on behalf of RAJESH SUKALAL DHIVAR and printed at M/S. SHREE SAMARTH PRINTERS, APPA BALWANT CHOWK, NEAR PRABHAT THEATRE, 535, SHANIWAR PETH, PUNE – 411030 (MS) and published at H NO 3 1ST FLOOR DREAMS IND PARK S N 199 POMAN ROAD KOLHI, TAL VASAI, PALGHAR, MAHARASHTRA - 401208 (Ms) Editor RAJESH SUKALAL DHIVAR "
Mob.: 9049940157 E-Mail- samajsatta@gmail.com, RNI NO. MHMAR/26/A1491
मराठी साप्ताहिक समाज सत्ता के मुद्रक : राजेश सुकलाल धिवर तथा प्रकाशक : राजेश सुकलाल धिवर द्वारा के पक्ष में श्री समर्थ प्रिटर्स, आप्पा बळवंत चौक, प्रभात थिएटर के पास, ५३५, शनिवार पेठ, पुणे ४११०३० महाराष्ट्र से मुद्रित तथा एच नं ३ पहली मंजिल ड्रीम्स इंड पार्क एस एन १९९ पोमन रोड कोल्ही, ताल वसई, पालघर, महाराष्ट्र - ४०१२०८ महाराष्ट्र से प्रकाशित, संपादक राजेश सुकलाल धिवर
मोबा.: ९०४९९४०१५७ E-Mail- samajsattagmail.com, RNI NO. MHMAR/26/A149

## 'ग्री हॅकेथॉन'च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून पुण्याची ओळख- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

- **'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' आयोजित कार्यक्रमात महिला शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन**
- **दुसऱ्या 'पुणे ग्री हॅकेथॉन'चे उपमख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन**

**पुणे :** गतवर्षी जून महिन्यामध्ये आयोजित पुणे ग्री हॅकेथॉनातील १६ नाविण्यपूर्ण उत्पादनांपैकी निवडलेल्या ४ उत्पादनांना कृषी यांत्रिकीकरण योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही राज्य शासनामार्फत सुरु आहे. या वर्षी विविध राज्यातील सुमारे १ हजार ३०० स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून यामध्ये महाराष्ट्र राज्यातून ८६७ स्पर्धकांनी भाग घेतला आहे. यामुळे ॲग्री हॅकेथॉनच्या यशस्वी आयोजनातून पुणे हे विद्येच्या माहेरघरासोबतच कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून ओळखले जात आहे, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. संयुक्त राष्ट्रांने यंदाचे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले असून या पार्श्वभूमीवर राज्यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये अधिकाधिक महिला शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालयाच्या सिंचननगर येथील दुसऱ्या पुणे ग्री हॅकेथॉन-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, ग्रीनरोड इनोवेशन इस्रायलचे अध्यक्ष शफरीर गोडेल, जुरी कमिटी सह अध्यक्ष प्रा.डॉ. के. ई. लवांडे, डॉ. राजाराम देशमुख, सुपर जुरी तथा महाराष्ट्र कृषी तंत्र संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. उमाकांत दांगट आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, महाराष्ट्र हे कृषी क्षेत्रात देशात आघाडीवर असलेलं राज्य असून ऊस, साखर, भाजीपाला उत्पादन आणि फलोत्पादनात तसेच कृषी निर्यातीतदेखील अग्रेसर आहे. कृषी क्षेत्रासाठी 'कृत्रीम बुद्धीमत्ता धोरण' (एआय पॉलिसी) जाहिर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एआय पॉलिसीकरीता सन २०२५ च्या अर्थसंकल्पात यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करुन ठेवली होती. तसेच त्यांच्या प्रयत्नामुळेच बारामती येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कृत्रीम बुद्धीमत्ता केंद्र उभारण्यात आले आहे.

त्या पुढे म्हणाल्या, राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्तेबरोबरच कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषी समृध्दी योजना जाहिर केली. त्यासाठी अर्थसंकल्पात २ हजार कोटी रुपयांची तरतुद केली आहे. यावर्षीच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना खतांची अडचण येणार नाही याची काळजी घेतली जात आहे. हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार यावर्षी पाऊस कमी झाल्यास उद्भवणाऱ्या परिस्थितीत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील.

## खरीपासाठी खते-बियाण्यांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करा; बोगस निविष्ठांविरोधात कारवाई करा- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

- **एल-निनोची पार्श्वभूमी लक्षात घेऊन नियोजन करण्याच्या सूचना**

**पुणे :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना खते व बियाण्यांचा पुरेसा आणि वेळेवर पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. बोगस बियाणे व खतांच्या तक्रारींवर गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत धडक कारवाई करण्याचे आदेश देतानाच 'एल-निनो'ची पार्श्वभूमी लक्षात घेऊन नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयातील झुंबर हॉल येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे खरीप हंगाम आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

बैठकीला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार नीलमताई गोऱ्हे, दिलीप वळसे पाटील, शरद सोनवणे, राहुल कुल, विजय शिवतारे, शंकर जगताप, सुनील शेळके, बाबासाहेब काळे, ज्ञानेश्वर कटके, शंकर मांडेकर आणि भीमराव तापकीर हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. प्रत्यक्ष बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री म्हणाल्या, खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी कृषी विभागाने निविष्ठा पुरवठा व वितरण प्रक्रियेवर सातत्याने लक्ष ठेवावे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्यात यावी. नैसर्गिक शेतीचा प्रसार वाढवण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी अधिक प्रभावी जनजागृती व मार्गदर्शन करावे. यंदा 'एल-निनो'च्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत आवश्यक बदल करावेत, असेही त्यांनी सांगितले.

महिला शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर 'ड्रोन दीदी' योजनेप्रमाणे ड्रोन उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक असल्याचे सांगून एकल महिला शेतकऱ्यांना विविध योजनांमध्ये प्राधान्याने सवलती देण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील सुधारणांनुसार कार्यवाही करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. कडधान्ये, डाळिंब, पेरू, द्राक्ष यांसह विविध पिकांचे नियोजन वेळेत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुढाकाराने महात्मा फुले स्मारक रहिवाशांच्या प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

- **लोकांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल - डॉ. नीलम गोऱ्हे**

**मुंबई :** पुण्यातील महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीच्या प्रलंबित प्रश्नांबाबत विधानभवनात आढावा घेण्यात आला. पुनर्वसनाची प्रक्रिया राबविताना स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेण्यात यावे, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समिती, पुणे यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष व ऑनलाईन बैठक पार पडली. या बैठकीत रहिवाशांच्या पुनर्वसन, मोबदला, फ्लॅट वाटप आणि सर्वे क्षणसंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना इतर महानगरपालिकांमध्ये देण्यात आलेल्या मोबदल्याचा अभ्यास करण्यात यावा, असे निर्देश दिले. महानगरपालिका किती जागा सामावून घेऊ शकते याचाही अभ्यास करण्यात यावा. ज्या महानगरपालिकांमध्ये जितका मोबदला देण्यात आला आहे त्याचाही अभ्यास करण्यात येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना १५ तारखेला विशेष बैठक घेण्यात यावी, अशा सूचना दिल्या. संबंधित रहिवाशांसमोर धोरण मांडण्यात यावे, त्यांना आवाहन करण्यात यावे आणि त्यांचा विश्वास संपादन करण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.

### खरीप हंगाम सन २०२५ राज्यस्तरीय पिकस्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ८ शेतकरी विजेते

**पुणे :** राज्यात खरीप हंगाम सन २०२५ मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या ११ पिकांसाठी राज्य पातळीवरील पीकस्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ८ शेतकरी विजेते झाले असल्याचे संजय काचोळे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी पुणे यांनी कळविले आहे. ज्या शेतकऱ्यांची स्पर्धेत भाग घेतलेल्या पिकाची उत्पादकता तालुक्याच्या त्या पिकाच्या सरासरी उत्पादकतेच्या (त्या पिकाची मागील पाच वर्षांचे सरासरी उत्पादकता) दीडपट किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा शेतकऱ्यांना पीक स्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येते. सन २०२५-२६ राज्यस्तरीय पिक स्पर्धेत पिकनिहाय पुढील तालुक्यातील शेतकरी विजेते झाले आहेत. सोयाबीन आदिवासी गट प्रथम क्रमांक भाउ तुळशिराम वारे, ओतुर ता. जुन्नर, द्वितीय क्रमांक रामचंद्र विठोबा कातवारे, आलमे ता. जुन्नर, तृतीय क्रमांकअशोक राघु नाईकरे, कमान ता. खेड. सुर्यफुल सर्वसाधारण गटात प्रथम क्रमांक नारायण बाबा लोणकर, कऱ्हाटी ता. बारामती, पांडुरंग मारुती वाबळे, जळगाव कप ता. बारामती. भात आदिवासी गट प्रथम क्रमांक लक्ष्मण डोंगरु लोहकरे, मापोली ता. आंबेगाव, रामचंद्र चाहू कारोटे, दिगद ता. आंबेगाव. बाजरी सर्वसाधारण गटात तृतीय क्रमांक रायचंद बाबुराव शिंदे, विठ्ठलवाडी ता. शिरुर.

## नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**मुंबई :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

## नवीन कामगार नियमांवर नागरिकांनी सूचना-हरकती पाठवाव्यात

- **४५ दिवसांत अभिप्राय सादर करण्याचे कामगार विभागाचे आवाहन**

**पालघर :** कामगार व्यवस्थेला अधिक पारदर्शक, सुसंगत आणि आधुनिक स्वरूप देण्यासाठी केंद्र शासनाने २१ नोव्हेंबर २०२५ पासून चार महत्त्वपूर्ण कामगार संहितांची अंमलबजावणी संपूर्ण भारतात लागू केली आहे. यामध्ये वेतन संहिता २०१९, औद्योगिक संबंध संहिता २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता २०२० तसेच व्यावसायिक आरोग्य, सुरक्षा व कामाची स्थिती संहिता २०२० यांचा समावेश असून, विद्यमान २९ कामगार कायदे एकत्र करण्यात आले आहेत.

या नव्या संहितांच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय नियमांचा मसुदा तयार केला असून Vmo https://mahakamgar. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. या मसुद्यांबाबत उद्योग क्षेत्र, कामगार संघटना, कर्मचारी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी सूचना व हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन कामगार उप आयुक्त विजय चौधरी यांनी केले आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे नामकरण

- **शाश्वत विकासाची उद्दिष्टे डोळ्यासमोर केंद्राचे बळकटीकरण करा- उपमुख्यमंत्री**

**पुणे :** अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरण करतांना शाश्वत विकासाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून बळकटीकरण करावे, देशी गाईंचा प्रचार व प्रसार होण्याच्यादृष्टीने पुशपालकांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून देशी गाईचा मोठ्या प्रमाणात जतन व संवर्धन करण्याचे काम करावे, राज्यातील शेतकरी, पशुपालक आणि विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केल्या.

यावेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महात्मा फुले कृषी विद्यापीठ कुलगुरू डॉ. विलास खर्चे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर आदी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, येथे कार्यरत असलेल्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र असे नामकरण करण्यास राज्य शासनाने मान्यता देण्यात दिली होती ; त्यानुसार आज राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते नामकरण फलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी केंद्राच्या नुतन इमारतीच्या विकास कामाची पाहणी केली, यावेळी त्या बोलत होत्या.

श्रीमती पवार म्हणाल्या, देशी गायीचे शास्त्रीयदृष्ट्या संवर्धन, सुधारणा व संशोधन करणे आवश्यक असल्याने कृषी महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरणाचे काम दर्जेदार पद्धतीने व कालमर्यादेत पूर्ण करावे. कामे करतांना बदलत्या काळानुसार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा , तसेच या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, देखभाल व दुरुस्तीच्या अनुषंगाने साहित्य उपलब्धतेचा विचार करण्यात यावा. पर्यावरण संवर्धनाच्यादृष्टीने सोलरच्या माध्यमातून वीजनिर्मिती करण्यासाठी सोलर पॅनल बसवावेत.

केंद्रातील गाईंची संख्या विचारात घेता मलमुत्र व शेणाचे व्यवस्थापन करुन केंद्रामध्ये स्वच्छता ठेवावी. गाईंना पुरेसा प्रमाणात चारा, पाणी उपलब्ध राहील, याबाबत दक्षता घ्यावी. केंद्रामार्फत दुर्धापासून दुग्धजन्य उपपदार्थ निर्मितीवर भर देण्यात यावा, प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीवर भर देण्यात यावा, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

श्रीमती पवार म्हणाल्या, ग्रामीण विकास, शेती आणि पशुसंवर्धन क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या नावाने उभारण्यात आलेले हे केंद्र संशोधन, प्रशिक्षण आणि नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना नवी दिशा देणारे ठरेल. देशी गायींचे संवर्धन, उत्पादनवाढ आणि शाश्वत पशुपालन व्यवस्थापनासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करुन महिला शेतकरी प्रशिक्षण देखील या केंद्रात सुरु करण्याची सूचना केली.

शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी केंद्रामार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत माहिती दिली. इंधन तुटवड्याच्या काळात या केंद्राला विविध शेतकऱ्यांनी भेटी देवून येथील बायोगॅस प्रकल्पानुसार शेतकरी छोटे-छोटे प्रकल्प उभारत आहेत. शेतकरी, विद्यार्थी आणि संशोधकांसाठी अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देत देशी गायींच्या संवर्धनासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत असल्याचे डॉ. माने म्हणाले.

राज्य शासनाच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेले हे केंद्र ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी मार्गदर्शक ठरत असून आधुनिक पशुपालन तंत्रज्ञानाचा प्रसार, उत्पादनक्षमता वाढ आणि शाश्वत शेती व्यवस्थेला चालना देण्याचे कार्य करणार आहे. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून संशोधन आणि विस्तार कार्याला नवे बळ मिळणार असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी कोंकण विभाग सज्ज

- **नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणींना तात्काळ प्रतिसाद आणि आपत्ती व्यवस्थापनेविषयी माहिती प्रसिध्दी करणे आवश्यक.**
- **- कोकण आयुक्त रुबल अग्रवाल**

**नवी मुंबई :** आपत्ती काळात सर्व यंत्रणांनी नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणींना तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी अचूक नियोजन करावे, कार्य व बचाव साहित्य तात्काळ घटनास्थळी पोहचेल, याची खातरजमा करावी. तसेच आपत्ती व्यवस्थापनेबाबत नागरिकांना आवश्यक माहितीचा प्रचार व प्रसिध्दीवर विशेष भर द्यावा, असे निर्देश कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी दिले.

पावसाळा पूर्वीच्या आपत्ती व्यवस्थापन तयारीचा आढावा घेताना दूरदृष्यप्रणालीद्वारे कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांसह विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

या बैठकीस ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर, सिंधुदूर्ग, मुंबईचे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी,महानगरपालिका आयुक्त, नगरपालिका अधिकारी, जिल्हा परिषद अधिकारी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, कोकण रेल्वे, एसटी महामंडळ, नागरी संरक्षण, हवामान विभाग व औद्योगिक आरोग्य सुरक्षा विभागातील अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त रुबल अग्रवाल म्हणाल्या की, कोकणात पावसाळ्यापूर्वी अचूक नियोजनाची आवश्यकता आहे. पावसाळयापूर्वी करण्यात येणारी नाले सफाई, रस्ते दुरुस्ती, झाडांची छाटणी अशी कामे पूर्ण करुन घेण्यात यावी.

कोकण विभागीय स्तरावर चोवीस तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, सर्व जिल्हा आणि तालुका स्तरावरही अशाच प्रकारचे अहोरात्र नियंत्रण कक्ष सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून संबंधित प्राधिकरणाकडून मंजूरी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरातील नालेसफाईची कामे ३१ मे २०२६ पूर्वी १००% पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच,अतिधोकादायक आणि बेकायदेशीर इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षित स्थलांतराचे नियोजन तातडीने करण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत.

कोकणात शोध व बचाव पथके कार्यरत असून त्यात प्रशिक्षित सदस्य आहेत. या सदस्यांनी आपदा मित्र उपक्रमांतर्गत तालुका व जिल्हास्तरीय प्रशिक्षण घेतले आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या साहित्यांची चाचणी घेण्यासाठी मॉक ड्रिल्स राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कोकण विभागात ०९ मोठे, ०९ मध्यम प्रकल्प आणि १४३ लघु प्रकल्प अशी धरणे आहेत. पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टीमुळे धरणे भरल्यास, नियोजित पद्धतीने पाण्याचा विसर्ग करावा व नागरिकांना वेळीच इशारा द्यावा. यासाठी स्थानिक प्रशासनाने (उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नगरपालिका) जलद प्रतिक्रिया देण्यासाठी नियंत्रण कक्ष सुरू करावा. विसर्गाच्या आधी संबंधित यंत्रणांना सूचना देणे आवश्यक आहे, विशेषतः जेथे पाण्याचा धोका संभवतो. धबधब्यांच्या ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजन करावे. अशा ठिकाणी जवळपासच्या रिसॉर्ट, हॉटेल मध्ये साहसी खेळांवर बंदी आणावी, अशा ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पावसाळ्यात पूर, दरड कोसळणे, वीज कोसळणे, चक्रीवादळ, झाडे/इमारती कोसळणे, रस्ते बंद होणे, या घटना घडतात. अशा वेळी जेसीबी, डंपर, वूड कटर, ट्रक अशी यंत्रसामग्री तात्काळ उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. बाधित नागरिकांना स्थलांतर करण्यासाठी शाळा, मंदिर, हॉल इ. ठिकाणे निवासासाठी सज्ज ठेवावी व पाणी, अन्न, वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात. धरणातील पाण्याचा विसर्ग नियोजित पद्धतीने करावा व स्थानिक प्रशासनाने विसर्गापूर्वी नागरिकांना वेळीच इशारा द्यावा. एनडीआरएफ च्या तुकडयांना तैनात ठेवावे. त्यांचे संपर्क क्रमांक अद्यावत ठेवावे. रेल्वे व रस्ते वाहतुकीस अडथळा झाल्यास पर्यायी वाहतुकीसाठी महाराष्ट्र परिवहन महामंडळाशी समन्वय साधावा, असेही त्या म्हणाल्या.

त्या म्हणाल्या की, पावसाळ्यात साथीचे रोग वाढू शकतात. यासाठी औषधांचा साठा, पाण्याचे शुद्धीकरण, साथरोग नियंत्रण कक्ष स्थापनेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. नागरी संस्थांनी नियमितपणे पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे.

सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये आणि महानगरपालिका स्तरावर २४७ आपत्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कक्षात संगणक, इंटरनेट, ई-मेल, दूरध्वनी, हॉटलाईन सेवा उपलब्ध असावी. आपत्तीशी संबंधित कोणतीही माहिती तात्काळ शासनाला कळवावी. नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणींना तात्काळ प्रतिसाद द्यावा, अशा सूचना आयुक्त रुबल अग्रवाल यांनी यावेळी दिल्या.

यावर्षी देशात नैऋत्य मान्सूनचे प्रमाण सामान्यपेक्षा थोडे कमी म्हणजे सुमारे ९२% (डझ-) राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात हवामान विभाग अधिक अद्ययावत अंदाज प्रसिद्ध करेल, तरीही प्रशासनाने कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहावे, असे आवाहन रुबल अग्रवाल यांनी यावेळी केले.

अडकलेल्या किंवा आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत करण्यासाठी जेसीबी, बोट्स आणि प्रशिक्षित मनुष्यबळ अर्ध्या तासाच्या आत घटनास्थळी पोहोचेल, याची खातरजमा करण्याचे आदेशही यावेळी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

**कोकण विभागातील आपत्ती नियंत्रण कक्षाचे क्रमांक..**

**जिल्हा दूरध्वनी नियंत्रण कक्ष- दूरध्वनी क्रमांक**

- **मुंबई शहर** ०२२-२२६६४२३२ ०८६५७१०६२७३
- **मुंबई उपनगर**०२२-६९४०३३४४ ०८१०४७२९०७७
- **ठाणे** ०२२-२५३०१७४० ०९३७२३३८८२७
- **पालघर** ०२५२५-२९७४७४ ०८२३७९७८८७३
- **रायगड** ०२४१-२२२११८/२२७४५२ ०८७५१५२३६३
- **रत्नागिरी** ०२३५२-२२२२३३ ०७०५७२२२२३३
- **सिंधुदुर्ग** ०२३६२-२२८८४७ ०७४९८०६७८३५
- **मंत्रालय कंट्रोल रुम** ०२२-२२०२७९९० ०२२-२२७९४२२९ ०९३२१५८७१४३

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुविधा

**पुणे :** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना ऊेलळपशव ऊशषशपलश डर्शीींळलशी परीक्षेची पूर्वतयारी करून देण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे उऊड कोर्स क्र. ६७ आयोजित करण्यात आला आहे. हा प्रशिक्षण वर्ग १५ जून ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार असून निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी १४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहावे असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

उमेदवारांनी Department Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या संकेतस्थळावरून उऊड ६७ कोर्सचे प्रवेशपत्र व संबंधित परिशिष्टांची प्रिंट घेऊन ती पूर्ण भरून दोन प्रतींसह मुलाखतीस यावे. प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक असून त्यांनी णझडउ मार्फत घेण्यात येणाऱ्या उऊड परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा.

या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दि. ०९ जून २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे मुलाखतीस उपस्थित राहावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी training.pctcnashikgmail. ले या ईमेलवर किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ तसेच व्हॉट्सॲप क्रमांक ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

## जनगणना प्रशिक्षणास गैरहजर ७ कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे :** भारत शासनाच्या जनगणना २०२७ कार्यक्रमांतर्गत फुरसुंगी-उरूळी देवाची नगर परिषद क्षेत्रात जनगणना कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वॉलनट स्कूल, फुरसुंगी येथील ७ शिक्षक व सपोर्ट स्टाफ सदस्यांनी प्रशिक्षणास गैरहजर राहून जनगणना कामकाज करण्यास नकार दिल्याची तक्रार फुरसुंगी पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आली आहे.

कर अधिकारी आबासो दादासो मुढे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, नगर परिषद क्षेत्रातील १६ वॉर्डांमध्ये २८४ घरगट तयार करण्यात आले असून जनगणना कामकाजासाठी २८४ प्रगणक व ४२ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार २३ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ दरम्यान फुरसुंगी-उरूळी देवाची नगर परिषद कार्यालयात जनगणना प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

# नव भारत साक्षरता कार्यक्रमासाठी उसनवारी तत्वावरील पदभरती अर्जास मुदतवाढ

**पुणे :** शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यावतीने केंद्र पुरस्कृत नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विविध पदांसाठी उसनवारी तत्वावर शिक्षक व अधिकारी संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र अपेक्षित प्रमाणात अर्ज प्राप्त न झाल्याने अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

हा कार्यक्रम राज्यातील १५ वर्षे व त्यापुढील वयोगटातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असून स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासकीय सेवेत कार्यरत शिक्षक, उपशिक्षणाधिकारी किंवा तत्सम गट-ब पदावरील अधिकारी, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक, विस्तार अधिकारी (शिक्षण) तसेच तत्सम पदांवरील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्यासाठी गुगल लिंक शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून अर्ज भरण्याचा कालावधी १५ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते २२ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत राहणार आहे.



# छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी - महापौर रवि लांडगे

**पिंपरी -** छत्रपती संभाजी महाराज हे अद्वितीय शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचे साक्षात प्रतीक होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान हे आजच्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांमधून राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि अन्यायाविरोधात लढण्याची प्रेरणा मिळते तसेच त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रहितासाठी योगदान देण्याचा संकल्प करावा, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्वराज्यलक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस तसेच चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यानातील शिल्पास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, रिटा सानप, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,माजी नगरसदस्य मारूती भापकर,सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ नखाते,आबासाहेब ढवळे,वैभव जाधव,जीवन बोऱ्हाडे,सागर तापकीर,जितेंद्र छाबडा,संजय कुरबट्टी,हेमा पारिसकर, हेमलता वाडेकर तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# पुणे जिल्हा नियोजन बैठकीत मंत्री चंद्रकांत पाटील यांचा ऑनलाईन सहभाग

- **दुर्गम भागातील विद्यार्थिनींसाठी विशेष बससेवा सुरू करण्याची सूचना**

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत कोथरुड येथील निवासस्थानावरून ऑनलाईन पद्धतीने सहभाग नोंदवला. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, वेळेची बचत आणि अनावश्यक प्रशासकीय खर्च टाळण्याच्या उद्देशाने ऑनलाईन प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी होत मंत्री पाटील यांनी काटकसरीचा संदेश दिला. बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील विविध विकासकामे, कायदा व सुव्यवस्था तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या.

नसरापूर येथील नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटनेची गंभीर दखल घेत दुर्गम भागातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी 'सीएसआर' निधीतून विशेष बससेवा सुरू करण्याची सूचना त्यांनी केली. तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पोलीस विभागाने व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

रेकॉर्डवरील गुन्हेगार तसेच संशयित विकृत मानसिकतेच्या व्यक्तींवर कायद्यानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत पोलीस प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंती उभारण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र 'बचत गट मॉल' उभारण्यात यावा, अशी सूचनाही त्यांनी केली. तसेच प्रत्येक गावात सुसज्ज स्मशानभूमी उभारण्यावर भर देण्यात यावा, असेही त्यांनी नमूद केले.

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या ऑनलाईन सहभागातून शासकीय संसाधनांचा योग्य व काटकसरीने वापर करण्याचा सकारात्मक संदेश मिळाल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.